आगच्छत् शिक्षार्थम् । निर्गच्छत् सेवार्थम् ।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

# School Leadership Academy, Maharashtra

# मोड्यूल क्र.४१

## शालेय स्तरावर विविध खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांत इंग्रजी विषयाची कौशल्ये विकसित होण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका

## The Role of School Leadership in Development of English Subject Skills among Students through Various Games at School Level.

**प्रस्तावना -**

जागतिकीकरणात इंग्रजी ही ज्ञानभाषा बनलेली असल्यामुळे इंग्रजी शिकणे ही काळाची गरज बनली आहे. कारण जगातील बहुतांश ज्ञान हे मूळ इंग्रजीत उपलब्ध आहे. किंवा इंग्रजीत भाषांतर केले गेलेले आहे. भारतात इंग्रजी भाषा उत्तम समजणारे लोक कमी प्रमाणात आहेत. परंतू जागतिक स्तरावर दिवसेंदिवस वाढत असलेले इंग्रजीचे महत्व पाहता आज इंग्रजी ही ज्ञानभाषा व संभाषण भाषा बनली आहे.

प्रत्येकाने आपल्या मातृभाषेत शिकणे हेच योग्य, तरीही इंग्रजी भाषेची ओळख हवीच, कारण आज ती जागतिक भाषा आहे. विज्ञान, तंत्र, आरोग्य अशा विविध क्षेत्रातील सर्व प्रगत ज्ञान मुबलक प्रमाणात इंग्रजी भाषेत आहे ते समजून घेण्यासाठी इंग्रजी ही जगाची ज्ञान भाषा आहे. जगातील 1/3 लोकांची व्यवहाराची भाषा इंग्रजी आहे. नवे संशोधनपर लेख इंग्रजीतून प्रसारित होतात. याचा अर्थ भारताला जागतिक पातळीवरच्या सर्व प्रकारच्या व्यवहारासाठी इंग्रजी समजणे महत्वाचे आहे.

एखादी भाषा आत्मसात होण्यासाठी श्रवण, भाषण, वाचन, लेखन, संभाषण या कौशल्यांची गरज असते हे लक्षात घेऊन निरनिराळे उपक्रम राबवून मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आवश्यक असते.

भारतातही भारतीय व्यक्ती प्रादेशिक दृष्टीने भिन्न व्यक्तिशी व्यवहार साधताना बरेचदा इंग्रजीचा आधार घेतांना दिसते. भारतात महत्वाच्या सर्वच जागांवर इंग्रजी आत्मसात केलेले व्यक्ती बव्हंशी दिसून येतात. सर्वच शैक्षणिक संस्था,

उद्योगाची कार्यालये या ठिकाणीही सफाईदार इंग्रजी हवी असे वातावरण अनेक ठिकाणी दिसून येते. या सर्व कारणामुळे पालकांचा ओढा इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे असतो. परंतू मातृभाषेतून मिळणाऱ्या शिक्षणातून मुलांचा विकास चांगला होतो हे सिद्ध झाले आहे. त्यामुळे मुलांना मातृभाषेतून शिक्षण मिळेल, त्याचबरोबर इंग्रजी माध्यमाप्रमाणे इंग्रजी विषय चांगल्या पध्दतीने मुले आत्मसात करतील अशी व्यवस्था असेल, तर पालक निश्चित मराठी माध्यमाची शाळा निवडतील. याचा विचार करुन प्राथमिक स्तरावरच इंग्रजीची भीती घालवली, तर मुले चांगल्या पध्दतीने इंग्रजी भाषेचे अध्ययन करतील. यासाठी शालेय नेतृत्वाच्या मार्गदर्शना खाली इंग्रजी विषयाचे निरनिराळे उपक्रम घेवून मुलांना इंग्रजीचे अध्ययन सोपे होण्यासाठीचे प्रयत्न या मोड्यूलमध्ये विषद केले आहेत.

गेल्या दशकात इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या संख्येत झालेली वाढ लक्षणीय आहे. अगदी छोट्या गावात सुध्दा इंग्रजी माध्यमांच्या शाळा आढळतात. पालकांचा कल इंग्रजी माध्यमाकडे वाढलेला आहे. यात बहुतांशी शाळा खाजगी आहेत, मोठ्या शहरांमध्ये महानगरपालिका / जिल्हा परिषदेने काही इंग्रजी / सेमी इंग्रजी शाळा सुरु केल्या आहेत. शिक्षण कुठल्याही माध्यमातून झाले तरी उच्च शिक्षण घेतांना इंग्रजी भाषेतील शिक्षणात अनेक पर्याय उपलब्ध आहेत. मातृभाषेतील शिक्षणास काही मर्यादा दिसून येतात.

शालेय शिक्षण ही मुलांच्या आयुष्यातील सर्वात महत्वाची गोष्ट आहे. सुजाण नागरिक होण्यासाठी शालेय शिक्षण अत्यंत महत्वाचे आहे. शाळेतील शिक्षक सर्वतोपरी प्रयत्न करुन विद्यार्थ्यांना शिक्षण देतात. शाळेत विषयांशी संबंधित ज्ञानाव्यतिरिक्त विद्यार्थ्याला व्यावहारिक जीवनाशी संबंधित व्यावहारिक ज्ञान नक्कीच मिळते. भाषा ही मानवनिर्मित सामाजिक संस्था आहे. जीवनातील सर्व व्यवहार भाषेच्या माध्यमातूनच पूर्ण होतात. भाषा नसती तर आपले कोणतेच व्यवहार सोपे झाले नसते. भाषा हे संपूर्ण मानवजातीला मिळालेले वरदान आहे. आपल्या देशात अनेक भाषा बोलल्या जातात. त्यात इंग्रजी ही महत्वाची भाषा आहे. कारण ती विज्ञान तंत्रज्ञानाची आणि जगाची व्यवहार भाषा आहे. समृध्द इंग्रजी वाडमयाने जगाला भूरळ घातली आहे.

महाराष्ट्र राज्यात मराठी भाषा विचार विनिमयाचे साधन म्हणून वापरली जाते. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जग जवळ आले आहे. त्यामुळे जागतिक भाषा म्हणून इंग्रजी भाषेवर प्रभुत्व प्राप्त करणे महत्वाचे ठरले आहे. म्हणूनच शालेय अभ्यासक्रमातसुध्दा इ. पहिलीपासून इंग्रजी हा विषय अनिवार्य केला आहे.

भारतीय शैक्षणिक प्रगतीसाठी अनेक आयोग निर्माण केले त्यात कोठारी आयोगाने त्रिभाषा सूत्र मांडले व इंग्रजी तृतीय भाषा म्हणून स्विकारली गेली, तसेच माध्यमिक स्तरावर इंग्रजी अनिवार्य केली. राज्य शासनाने पहिलीपासून इंग्रजी शिकविण्याचा निर्णय घेतल्यानंतर सर्वसमावेशक अभ्यासक्रम समिती नियुक्त केली. विद्यार्थ्यांनी इंग्रजीचे अध्ययन पहिलीपासून करण्यामागची मुख्य कारणे - 1) आनंददायी अध्ययन - अध्यापन पध्दती व सरावातून इंग्रजीबाबत आत्मविश्वास निर्माण करणे 2) इंग्रजी शिकण्याची उत्कंठा व गोडी निर्माण करणे. 3) सोपे इंग्रजी ऐकून समजणे 4) इंग्रजी भाषेच्या उच्चार पध्दतीचा परिचय होणे 5) गाणी व कविता तालावर म्हणता येणे. अशा वाजवी व वास्तव अपेक्षा ठेवण्यात आल्या. प्रत्यक्ष अंमलबजावणी करणाऱ्या शाळा, मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या कार्यातूनच इंग्रजी भाषेची गोडी वाढविण्याबाबतचे दृष्य परिणाम अनेक ठिकाणी दिसून येतात. अशाच एका इंग्रजी विषयाच्या शिक्षकाच्या प्रयत्नातून विद्यार्थ्यांची इंग्रजी शिकण्याची गती दिसून येते. त्याबाबतची यशोगाथा या मोड्यूलमध्ये समाविष्ट केली आहे.

**प्राथमिक स्तरावरील इंग्रजी -**

प्राथमिक स्तरावर इंग्रजी विषय सूरु झाला पण अनेक ठिकाणी त्या कडे फारसे गांर्भीयाने पाहिले जात नाही फक्त पाठांतर एवढेच ते मर्यादित राहीले. त्यामुळे यापुढे जाऊन इंग्रजी भाषा मुलांना अधिक जवळची वाटावी म्हणून इंग्रजीचा शब्द संग्रह वाढवणे आणि इंग्रजीतून वाचन, लेखन, संभाषण होणे आवश्यक आहे.

**शालेय नेतृत्वासमोर असलेली आव्हाने -**

**विद्यार्थी आव्हाने -** घरात इंग्रजी भाषेबद्दल अज्ञान असल्यामुळे ती भाषा बोलली, लिहीली, वाचली, ऐकली जात नाही. त्यामुळे साहजीकच मुलांचा इंग्रजीकडे कल कमी आहे. म्हणून मुलांना विषय अवघड वाटतो.

**शिक्षक आव्हाने -** विद्यार्थ्यांच्या घरात इंग्रजी भाषा बोलली जात नाही. पालक फारसे शिकलेले नाहीत अशावेळी मुलांना मातृभाषा अधिक जवळची वाटणे साहजिक आहे. त्याच बरोबर इंग्रजी भाषेचे महत्व पटवून त्याची आवश्यकता समजावून मातृभाषेप्रमाणे इंग्रजी भाषेची गोडी निर्माण करणे गरजेचे आहे.

**पालक आव्हाने -** ग्रामिण भागात वेगवेगळया बोलीभाषा बोलल्या जातात. ज्या शैक्षणिक प्रमाणभाषेपेक्षा वेगळ्या असतात. ग्रामीण भागातील पालकामध्ये जाणीव जागृतीचा अभाव आपणास दिसून येतो. इंग्रजी भाषेचा पगडा व खोटी प्रतिष्ठा जपण्याचे प्रमाण जास्त दिसून येत आहे. इंग्रजीच्या प्रभावी अध्यापनातून मुलांच्या आत्मविश्वास वाढल्यामुळे शाळेची पटसंख्या वाढवण्यात यशस्वी झालेल्या शाळेची ही यशोगाथा जि.प.प्राथमिक शाळा, भारज बु.,जाफ्राबाद, जि.जालना (सेमी इंग्रजी)

**इंग्रजीच्या प्रभावी अध्यापनातून मुलांचा आत्मविश्वास वाढल्यामुळे शाळेची पटसंख्या वाढविण्यात यशस्वी झालेल्या शाळेची ही यशोगाथा**

**यशोगाथा**

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,भारज बु.,ता.जाफ्राबाद,जि.जालना**

**मुख्याध्यापक - श्री गजानन उखळकर**

या शाळेत आज रोजी 587 विद्यार्थी आहे. प्रत्येक वर्गाच्या दोन तुकड्या (एकूण 14) आहेत. ग्रामीण भागातील शाळांमधून इंग्रजी विषय तृतीय भाषा म्हणून त्याकडे पाठांतरापेक्षा जास्त लक्ष दिले जात नाही. परिणामी मुले इंग्रजीत फारशी प्रगती करु शकत नाहीत व स्पर्धेच्या युगात मागे पडलेली दिसतात. त्यामुळे पालकांच्या ओढा इंग्रजी शाळांकडे असतो. पण जेव्हा मातृभाषेबरोबर इंग्रजीचा विचार केला गेला. तेव्हा येथे विद्यार्थ्यांच्या विकासाला वाव मिळेल आणि स्पर्धात्मक युगात विद्यार्थी उभा राहू शकेल हा विश्वास पालकांना वाटला. इतर विषयाबरोबर इंग्रजी विषयही तितकाच सहजपणे हाताळला जाऊ लागला. परिणामी आज विद्यार्थ्यांचा इंग्रजी विषयाचा शब्दसंग्रह वाढला. किमान 500 ते 10000 शब्द त्यांना पाठ आहेत. त्यामुळे इंग्रजीतून ते संवाद साधू शकतात. प्रश्न विचारणे, उत्तरे देणे, याचबरोबर सहजपणे ते मुलाखत घेऊ शकतात. इंग्रजीतून नाटिका ही सादर करुन शकतात. परिपाठ इंग्रजीतून घेतला जातो. इंग्रजी लिहीण्याच्या सरावामुळे इंग्रजीचे हस्ताक्षरही चांगले झाले आहे. वाचन, लेखन, संभाषण आत्मविश्वासाने करत आहेत.

अर्थात यासाठी शालेय नेतृत्वासमवेत सर्व शिक्षकांनी भरपूर मेहनत घेतली आहे. इंग्रजी विषयासाठी विविध उपक्रम शाळेत राबवत आहेत. आज शाळेत मातृभाषेबरोबरच इंग्रजी विषयाचीही तयारी करुन घेतली जाते. त्याकडे विशेष लक्ष दिले जाते. त्यासाठी खालील उपक्रम घेतले जातात.

उदा.1) **शब्द संपत्ती वाढवण्यासाठी Hide and Seek Game**

विविध साहीत्य उदा. बॅट, बॉल, खडू, पेन, बुक पेन्सिल, मोबाईल इत्यादी परिचयाच्या वस्तूची टेबलवर ठेऊन मुलांना दाखवल्या जातात थोड्या वेळानंतर त्या झाकून ठेवल्या जातात. मुलांनी वस्तु आठवून त्यांची नावे इंग्रजीतून लिहायची असतात. सर्व वस्तुंची नावे इंग्रजीतून अचूक लिहीणाऱ्या विद्यार्थ्यांचे टाळ्या वाजवून अभिनंदन केले जाते.

**फलनिष्पत्ती -** 1.विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती वाढते. 2.इंग्रजीमधील शब्दसंपत्ती विकसित होते. 3.इंग्रजी विषयाची आवड निर्माण होते.

**2) what is it ? -** विद्यार्थ्यांचे दोन गट तयार करून त्यांच्याकडे चित्र कार्ड दिले जाते. दोन्ही गटांनी आपले कार्ड दुसऱ्या गटाला दाखवून what is it ? असे विचारले जाते. पहिल्या गटातील विद्यार्थी त्या कार्डवरील चित्राचे नाव योग्य उच्चारणासह सांगतात.

**फलनिष्पत्ती - 1**.शब्द संपत्तीत वाढ होते. 2. खेळाद्वारे इंग्रजी स्पेलिंग लवकर पाठ होतात. 3.विद्यार्थ्यांमध्ये चुरस निर्माण होते. 4.विद्यार्थ्यांच्या उच्चांरामध्ये सुधारणा होते.

**3) Similar Sound Word Game -** विद्यार्थ्यांचे दोन गट केले जातात. एका गटाने एक शब्द सांगायचा असतो तर दुसऱ्या गटाने त्याच शब्दानुरुप समान ध्वनीने सुरू होणारा शब्द सांगायचा असतो.

उदा. Bat Bad, sat sad, cat cap, top toy, got god इत्यादी.

**फलनिष्पत्ती -** 1.शब्दातील ध्वनी लक्षपुर्वक ऐकण्याची सवय लागते. 2.योग्य उच्चार केले जातात. 3. इंग्रजी श्रवण भाषण कौशल्याचा विकास होतो. 4.शब्द संग्रह वाढतो. 5.स्पर्धात्मक वातावरण तयार झाल्याने मुले खेळाचा आनंद घेतात.

**4) Quiz Competition -** वर्गातील मुलांचे तीन गट केले जातात. प्रत्येक गटाचा गटप्रमुख नेमला जातो. या स्पर्धेत पाच फेऱ्या होऊन प्रत्येक फेरीमध्ये गटाला प्रश्न विचारला जातो. प्रत्येक फेरीला पाच गुण ठेवण्यात येतात. पहिल्या गटाला उत्तर न आल्यास दुसऱ्या गटाकडे प्रश्न जातो व अशा प्रकारे योग्य उत्तर देणाऱ्या गटाला गुण मिळतात. फळ्यावर गुण फलक आखला जातो, ज्यामुळे स्पर्धेचे वातावरण तयार होते.

पहिली फेरी - Alfabet पासून तयार होणारे शब्द - Alfabet च्या चिठ्ठ्या प्रत्येक गटाला दिल्या जातात. त्यापासून शब्द तयार केले जातात. उदा.A- Ant, B- Bat

दुसरी फेरी - What Colour is it ? - शाळेत रंगीत कार्ड तयार केलेले आहेत. प्रत्येक रंगाचे कार्ड उचलून त्याचा रंग विद्यार्थ्यांनी सांगायचा असतो.

तीसरी फेरी - Join the Letters - शब्दातील सारखे अक्षर रेखांकीत करणे. फळ्यावर वेगवेगळे शब्द लिहीले जातात. त्यातील सारखे अक्षर रेखांकीत करण्यास सांगितले जाते.

उदा. To**p**, Gra**p**es, **P**en

चौथी फेरी - Listen and Act - प्रत्येक गटाला एक सूचना देऊन त्यानुसार मुले कृती करतात.

उदा. Stand up, Close your eyes ,Hands up etc.

पाचवी फेरी - Whats is This पक्षी / प्राणी यांची पाच पाच चित्रकार्ड प्रत्येक गटाला दाखविली जातात. बरोबर ओळखणाऱ्या गटास प्रत्येक प्रश्नाला एक गुण दिला जातो.

याप्रमाणे प्रश्नमंजूषा हा खेळ घेऊन विजयी गटाचे अभिनंदन करण्यात येते.

**फलनिष्पत्ती -** 1.विद्यार्थी सहज हसत खेळत शिकतात. 2.श्रवण भाषण कौशल्यांचा विकास होतो. 3.विद्यार्थ्यांत सभाधिटपणा येतो.

### 5) Rhyming words Mahabank

विदर्यार्थ्यांचे दोन गट करुन ज्या गटाचे जास्त व अचूक Rhyming words तयार होतील तो गट विजेता.

**फलनिष्पत्ती -** 1.शब्द संपत्ती विकसित होते. 2.योग्य उच्चार करण्याची सवय लागते. 3. पूर्व ज्ञानाचे दृढीकरण होते. 4.अबोल विद्यार्थीही चर्चेत सहभागी होतात.

**6) Let Us Speak English -** सोपे संभाषण चित्राद्वारे समजावणे नंतर प्रत्यक्ष सादरीकरण याप्रमाणे दोन दोन विद्यार्थ्यांची गटात कृती घेतली जाते.

Ex. Give me your pensil please.

Here it is

Thank You

Welcome

ज्या जोडीचे संभाषण व सादरीकरण उत्तम ती जोडी इंग्रजी अभ्यासमंत्री म्हणून घोषित केली जाते.

**फलनिष्पत्ती -** 1.संभाषण कौशल्याचा विकास होतो. 2.विद्यार्थी आवडीने संवाद साधण्याचा प्रयत्न करतात.

या सारखे खेळ घेतले जातात. यामुळे विदयार्थी आत्मविश्वासाने इंग्रजी बोलत आहेत. निरनिराळ्या स्पर्धेत भाग घेत आहेत. त्यामुळे पालक ही समाधानी आहेत, यातून शाळेचा पट वाढला. म्हणजेच इंग्रजी भाषा समृध्दी आणि पट संख्या वाढ असा दुहेरी फायदा या उपक्रमामुळे झाला.

# इंग्रजी विषयाचे विविध उपक्रम

## ENGLISH CLUB (इंग्रजी विषय समिती)




**ENGLISH CLUB MEMBERS**


- CONVERSATION https://youtu.be/M9E6NCKAhM8




CONVERSATION IN CLASS

- SELF INTRODUCTION https://youtu.be/rNn3bPOxttQ

(




- FRIENDS INTRODUCTION https://youtu.be/gFH5NLa6rZM

- TAKING INTERVIEW




TEACHER'S INTERVIEW

- READING ACTIVITY




https://youtu.be/pL4pP3DmtOI

ASKING QUESTIONS ABOUT OBJECT



Questions about the object


- DESCRIBING PICTURE



- DESCRIBING OBJECT https://youtu.be/MxOV899tJQ0

- POEMS/ RHYMES https://youtu.be/ij6Itp4C--Y

- HANDWRITING PRACTISE


Date: 3 3 23

There is a thick layer of a waxy substance on the stem of these plants, too

ADAPTATION IN PLANTS OF SNOWY REGION

Plants of snowy branches useful to plants in a snowy region?

Plants of snowy regions mainly include conifers like deodar and pine. These trees are conical in shape due to their sloping branches.

Date: 4 3 23

In the heavy snowfall and extreme cold in these regions, their conical shape prevents the snow from accumulating on the tree and the thick bark helps the tree to withstand the cold.

ADAPTATION IN PLANTS OF FOREST REGION

A variety of plants trees, shrubs and herbs are found in forests. These plants complete amongst themselves for sunlight.


WRITING ON DIFFERENT TOPICS

- SKIT/DRAMA https://youtu.be/J1BcMxUsjmU



## पटसंख्या वाढ

| वर्ष | 2016-17 | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 | .2022-23 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पटसंख्या | 554 | 541 | 525 | 578 | 554 | 580 | 587 |
| सेमी इंग्रजी माध्यमातील प्रवेश | 2 | 2 | 5 | 20 | 22 | 25 | 30 |




| | 2016-17 | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 | 2022-23 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पटसंख्या | 554 | 541 | 525 | 578 | 554 | 580 | 587 | |
| सेमी इंग्रजी माध्यमातील प्रवेश | 2 | 2 | 5 | 20 | 22 | 25 | 30 | |

**जि.प.कें.प्रा.शा.भारज बु. ता.जाफ्राबाद जि, जालना**


### आलेख विश्लेषण –

उपरोक्त आलेखामध्ये पटसंख्येचा आलेख उंचावलेला दिसतो. सन 2016 – 2022 पर्यंतचीपटसंख्येचा आलेख 2019 पासून उंचावलेलादिसत आहे 2022 मध्ये सर्वात उंच दिसत आहे. सेमी इंग्रजी माध्यमातील प्रवेश संख्या सुध्दा वाढलेली दिसत आहे.

इंग्रजीचे विविध उपक्रम सतत शाळेत राबविल्यामुळे विद्यार्थ्यांचे सेमी इंग्रजी माध्यमाच्या वर्गात प्रवेश घेण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसत आहे.

इय्यता पहिली प्रवेश

| वर्ष | 2016-17 | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 | 2022-23 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ग पहिला प्रवेश संख्या | 73 | 63 | 68 | 76 | 67 | 88 | 75 |




**जि.प.कें.प्रा.शा.भारज बु. ता.जाफ्राबाद जि, जालना**

**आलेख विश्लेषण**

उपरोक्त आलेखामध्ये इयत्ता पहिली पटसंख्येचा आलेख उंचावलेला दिसत आहे. सन 2016 – 2022 पर्यंतची इयत्ता पहिली पटसंख्येचा आलेख 2019 पासून उंचावलेला दिसत आहे. सध्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे प्रमाण वाढतांना दिसत आहे. मात्र शाळेतील इंग्रजी विषयाला विशेष लक्ष दिल्याने पहिली पासूनच प्रवेशात वाढ होतांना दिसत आहे.

**चिंतनात्मक प्रश्न (विचार करूया) -**

- इंग्रजी विषयाची भीती दूर करण्याकरिता मुख्याध्यापक म्हणून तुम्ही कोणते विशेष प्रयत्न कराल ?
- मुलांना उत्तम इंग्रजी येण्यासाठी पहिलीपासून पूर्णतः इंग्रजी माध्यमात शिकणे आवश्यक आहे अथवा नाही किमान ३ ते ४ मुद्यात आपला अभिप्राय लिहा ?

**शालेय नेतृत्वाच्या दृष्टीकोनातून मोड्युलची उपयुक्तता -**

मातृभाषेत शिक्षण देताना इंग्रजीचाही विकास करता आला. तर विद्यार्थी स्पर्धात्मक युगात उभा राहू शकेल- शालेय जीवनात इंग्रजीचा पाया भक्कम झाला तर विद्यार्थीत आत्मविश्वास निर्माण होईल म्हणून शालेय नेतृत्वासाठी हे मोड्यूल उपयुक्त आहे.

1) इंग्रजी विषयक उपक्रम विद्यार्थ्यांना प्रयत्न करण्यास आणि टिकवून ठेवण्यास मदत करतात ते मूलभूत भाषा कौशल्यांमध्ये सराव देतात. ऐकणे, बोलणे, वाचणे आणि लिहीणे ते विद्यार्थ्यांना संवाद साधण्यासाठी प्रोत्साहित करतात, त्याबाबतची माहिती मोड्यूलमध्ये मिळते.

2) इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय संवादाची भाषा आहे. इंग्रजी शिकणे महत्वाचे कारण ते जागतिक नागरिकांशी सहज संवाद साधण्यास सक्षम करते, याचा प्रत्यय काही प्रमाणात विद्यार्थ्यांच्या इंग्रजी उच्चारातून दिसून येतात.

3) आनंददायी उपक्रमातून विद्यार्थी सहभाग घेऊन प्रयत्न करु शकतात, याचा बोध या मोड्यूल मधून होतो.

4) शिक्षकांचे प्रामाणिक प्रयत्न विद्यार्थ्यांच्या अध्ययनास पूरक ठरतात हे या मोड्यूलद्वारे दिसून येते.

5) शालेय नेतृत्व सक्षम असल्यास, विद्यार्थी शिकण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत असल्यास अवघड गोष्टी सोप्या होऊ शकतात हे ही लक्षात येते.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने मोड्यूलची उपयुक्तता -**

राष्ट्रीय एकात्मता आणि संस्कृतिचे जतन करण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देणे महत्वाचे आहे. व्यक्ती, समाज, देश हितासाठी आपल्या देशातील संसाधनांचा पूरेपूर वापर करण्याकरीता उच्च दर्जाचे सार्वभौमिक शिक्षण हा भविष्यासाठी सर्वात चांगला मार्ग आहे.

1. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 घटक चार मधील 4.4 नुसार या धोरणाचा प्रामुख्याने भर आहे तो समज वाढविणे व घोकंपट्टीपासून शिक्षण व्यवस्थेला दूर नेणे. चांगले व्यक्तीमत्व घडवणे आणि 21 व्या शतकातील प्रमुख कौशल्ये आत्मसात केलेल्या व्यक्ती निर्माण करणे यावर धोरणाचा भर असल्याने प्रस्तुत मोड्यूल मध्ये शालेय नेतृत्वाने वापरलेले अनेक उपक्रम व समजपूर्वक इंग्रजीचे अध्ययन यातून विद्यार्थी योग्य पध्दतीने घडू शकतात हेच दर्शविते.

2. NEP 2020 घटक चार मधील 4.6 नुसार अनुभवात्मक शिक्षणाचा अवलंब शालेय स्तरावर केला जाईल. ज्यात प्रात्यक्षिक शिक्षण, कला, खेळ यांचा वापर समवायात्मक शिक्षण यांची उपयुक्तता विशद केलेली आहे. ज्याचा प्रत्यक्ष वापर या मोड्यूल मधील विविध खेळांच्या माध्यमातून शिकण्यासंदर्भात जोडला गेलेला आहे.

3. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 घटक चार मधील 4.12 नुसार दोन ते आठ वर्षे या वयात मूले भाषा अतिशय लवकर शिकतात आणि या बहुभाषिकत्वाचा लहान मुलांना आकलणासाठी खुप फायदा होतो. म्हणूनच विविध भाषांची ओळख करुन देऊन सर्व भाषा आनंददायक व परस्पर संवादी पध्दतीने शिकवल्या जातील असे नमुद केल्याप्रमाणे निश्चितपणे विद्यार्थ्यांच्या शब्द संपत्तीमध्ये आणि आकलन क्षमतेत वाढ होते हेच मोड्यूलमध्ये दिसून येते.

अशा प्रकारे इंग्रजी भाषेची गोडी वाढविण्यासाठी या मोड्यूलमध्ये शिक्षकांनी केलेले प्रयत्न व त्यास शालेय नेतृत्वाची साथ आनंददायी शिक्षणाची पूर्तता दर्शविते.

**संदर्भ ग्रंथ -**

1. करंदीकर सुरेश (2009) अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र, कोल्हापूर, फडके प्रकाशन
2. शिक्षणाचे अधिष्ठान - मानसशास्त्रीय (1992) नाशिक, यचम मु.विद्यापीठ
3. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020
4. शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम, पूरक वाचन साहित्य, जानेवारी 2018, संचालक महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
5. दि.14 ऑगस्ट 2016 महाराष्ट्र टाईम्स (संपादकीय लेख)

**मोड्यूल विकसक**
श्री दत्ता गवळी
प्राथमिक पदवीधर शिक्षक
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,
भारज बु.,ता.जाफ्राबाद, जि.जालना
आणि
डॉ.कल्पना जोशी
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद

**समन्वयन**
डॉ.ज्योती कुलकर्णी
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद

**मार्गदर्शक**
श्री रमाकांत काठमोरे
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद